# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.)

**मा. सर्वसाधारण सभा**

**मा.सर्वसाधारण सभा सूचना क्र.१३**

**दि. १२/१०/२०२६**

प्रति,

मा. श्री / श्रीमती .......................................,

नगरसेवक / नगरसेविका,

वसई-विरार शहर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा बुधवार, दि.२१/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता 'सर्वसाधारण सभागृह', ४ था मजला, वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, यशवंत नगर, विरार (प.) येथे खालील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणेसाठी आयोजित करण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेस कृपया उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा.सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका**

१. मागील दि.२३/०९/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.

२. प्रश्नोत्तरे.

३. शासकीय पत्र व्यवहार माहितीस्तव.

४. वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग ३ व ४ संवर्गातील कर्मचाऱ्यांना वित्तीय वर्ष २०२६-२७ मध्ये सानुग्रह अनुदान अदा करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

५. वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील "उप अभियंता" संवर्गातील कर्मचाऱ्यांना "कार्यकारी अभियंता" या पदावर पदोन्नती देणेबाबत.

६. वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात माहिती शिक्षण प्रसार व जनजागुती/ नागरिकांच्या सवय मधील बदल (Information Education Communication/ Behaviour Change Communication) संबंधित उपक्रम राबविणेकरिता अभिकर्त्यांची नियुक्ती करणेकामी होणाऱ्या खर्चास मा.सर्वसाधारण सभेपुढे सुधारीत ठरावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

७. स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्राप्त तांत्रिक मान्यता तसेच दि.०१/१०/२०२६ रोजी झालेल्या SLTC बैठकीतील मौखिक सूचनांनुसार प्रकल्पांच्या सुधारित ठरावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्याबाबत.

८. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकारच्या विविध व्यासाच्या केबल रस्ता / जमिन खोदाई करुन टाकण्याच्या परवानगीसाठी सुधारीत शुल्क निश्चित करण्याबाबत निर्णय घेणे.

९. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात LiDAR Survey व Flood Inundation Mapping करणेकामी केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान, खडकवासला, पुणे या केंद्र शासकीय संस्थेची नियुक्ती करण्यास व त्यांनी कळविल्यानुसार येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१०.वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या १) पाणी पुरवठा वितरण व्यवस्था बळकटीकरण व विस्तारीकरणाच्या फेज II, २) खोलसापाडा-१ व २ तसेच ३) तृतीय स्तरीय सांडपाणी प्रकल्प (TTP) उभारणे या प्रकल्पांकरीता तांत्रिक

सल्लागाराच्या केलेल्या नेमणूकीस व खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. (दि.२३/०९/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेतील विषय क्र.७ स्थगित विषय)

११.वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील पश्चिम पट्ट्यातील गा वांमध्ये विकेंद्रित (Pocket STP/Decentralized STP) सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याकरीता तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. (दि.२३/०९/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेतील विषय क्र.८ स्थगित विषय)

आपला विशासू,

(विश्वनाथ तळेकर)
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

(मा.महापौर महोदय यांच्या मान्यतेने)